# नियमित दिवाणी दावा क्र.१३३/२०१५ मधील नि.३१ खालील आदेश

प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी त्यांच्याविरुध्द दाव्याच्या कामी विनाकैफियत दावा चालविण्याबाबतचा आदेश जो पारीत झाला आहे तो रद्दबातल ठरवून कैफियत दाखल करुन घ्यावी अशी विनंती केली आहे.

२. वादीने प्रस्तुत अर्जास आपले म्हणणे देवून सांगतो की, प्रतिवादींच्या अर्जातील कारण संयुक्तिक नाही. दाव्याचे कामकाज लांबविण्याकरिता मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. तेव्हा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

३. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

४. अर्जातील कथन आणि म्हणणे यावरुन खालील मुद्दे काढण्यात आले आहेत व त्या मुद्दयांसमोरील उत्तराप्रमाणे खालील कारणास्तव निष्कर्ष, निर्णय देण्यात येत आहेत.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रतिवादींच्या अर्जातील कैफियत दाखल न करण्यामागचे कारण संयुक्तिक आहे असे वादी सिध्द करतात काय? | नकारार्थी |
| २ | न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादींची कैफियत दाखल करुन घेण्यात यावी काय? | होकारार्थी |
| ३ | आदेश कोणते? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्रमांक १ व २ करिता:

५. प्रतिवादी प्रस्तुत दाव्याच्या कामी दि.१०.०७.२०१५ रोजी हजर राहिला आणि विहीत मुदतीत ३० दिवसांपासून ९० दिवसांपर्यंत जास्तीत जास्त कालावधी असताना कैफियत दाव्याच्या कामी

दाखल केली नाही आणि प्रस्तुत अर्ज दि.०७.०४.२०१६ रोजी दाखल केला आहे. प्रतिवादींनी कैफियत साधारणपणे प्रस्तुत अर्जासोबत ९ महिन्यांनी दाखल केली आहे. मुदतीत कैफियत दाखल न करण्यामागचे कारण म्हणजे त्यांना कैफियतीसाठी आवश्यक असणारी माहिती व कागदपत्रे वेळेत उपलब्ध झाली नाहीत. ज्याअर्थी अशाप्रकारचे कारण दाखवितात त्याअर्थी कैफियतीसोबत दाव्याच्या कामी कैफियतीव्दारे मांडले जाणारे बचावाचे मुद्दे यास अनुसरुन आवश्यक असा कागदोपत्री पुरावा दाखल करणे आवश्यक होते. परंतु तसा कोणताही कागदोपत्री पुरावा प्रतिवादींनी दाखल केला नाही. यावरुन त्यांच्या अर्जातील कारण संयुक्तिक नाही असे स्पष्ट होते. वादीने प्रतिवादींविरुध्द प्रस्तुत दावा वाटपासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. दाव्याच्या कामी प्रतिवादी एकूण ७ आहेत. तथापि, कोणत्याही प्रतिवादीने दाव्याच्या कामी कैफियत दाखल केली नाही. तसेच वादीने देखील दाव्याचे कामकाज सुरु करुन घेतलेले नाही. दाव्याच्या कामी कोणताही पुरावा दाखल केला नाही. दाव्यातील वादमुद्दे अंतिमरित्या निकालात काढण्याकरिता दोन्ही बाजूंच्या पक्षकारांना आपआपला तोंडी व कागदोपत्री पुरावा करण्याची संधी दयावी असे मे. उच्च न्यायालयाचे न्यायनिर्देश आहेत. त्यामुळे प्रतिवादींचा प्रस्तुत अर्ज न्यायाच्या दृष्टीने मंजूर करण्यात यावा या मतास मी आलो आहे. यावरुन मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी, मुद्दा क्र. २ चे उत्तर होकारार्थी घेतले आहे आणि मुद्दा क्र. ३ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आ दे श

**१.** प्रतिवादींचा प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात आला आहे.

sdxx
**(वि.र.दासरी)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कडेगांव**

कडेगांव.
ता.११.०७.२०१६.